# जिल्हाधिकाऱ्यांनी जाणून घेतल्या बालगृहातील समस्या

## प्रशासनाला निर्देशः बालकांना सुरक्षित, आनंदी व पोषक वातावरण द्या

■ सकाळ वृत्तसेवा

**बुलडाणा, ता. १६ : बालकांचे हक्क, सुरक्षितता आणि सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी जिल्ह्यातील बालगृहांच्या अचानक तपासणी दौऱ्यांवर भर दिला आहे.**



**बुलडाणाः** बालगृहातील व्यवस्थेची चाचपणी करताना जिल्हाधिकारी व इतर.

या अनुषंगाने त्यांनी १४ ऑक्टोबर रोजी बुलडाणा येथील शासकीय मुलांचे निरीक्षणगृह व बालगृह, मुलींचे बालगृह तसेच विशेष दत्तक संस्था 'दि लव्ह ट्रस्ट' येथे भेट देऊन पाहणी केली.

जिल्हास्तरीय तपासणी समितीच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी सकाळी ११.३० वाजता शासकीय मुलांच्या निरीक्षणगृह व बालगृहाची अचानक तपासणी केली.

यावेळी संस्थेतील सर्वसाधारण व्यवस्था, स्वयंपाकगृहाची स्थिती आणि बालकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची पाहणी करण्यात आली.

तसेच बालकांशी वैयक्तिक संवाद साधून त्यांच्या अडचणी, गरजा व अपेक्षा जाणून घेतल्या. यानंतर त्यांनी कनिष्ठ व वरिष्ठ मुलींच्या बालगृहाला भेट देऊन बालिकांशी संवाद साधला.

त्यांच्या समस्या जाणून घेत बालगृहातील व्यवस्था आणि सुविधांचा आढावा घेतला.

बालकांच्या काळजी व संरक्षणाशी संबंधित कोणतीही समस्या उद्भवल्यास त्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन तातडीने कार्यवाही केली जाईल.

यासाठी आपण २४ तास उपलब्ध असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. देवरे यांनी नमूद केले.

### संगोपन आणि पुनर्वसन

■ **बालगृहांमध्ये बालकांना सुरक्षित, आनंदी व पोषक वातावरण मिळणे आवश्यक असून, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. देवरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. बालकांच्या हक्कांचे संरक्षण, शिक्षण, आरोग्य, संगोपन आणि पुनर्वसन या बाबींवर विशेष लक्ष देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.**

---

## अवतीभवती

### दुष्काळ निवारणासाठी जनजागृती

**मोताळा :** संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी बोराखेडी येथील केबीजे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांमार्फत जनजागृती करण्यात येणार आहे. याबाबत प्रा. गणेश झंवर यांनी बुधवारी (ता. १४) सभा घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायतींच्या माध्यमातून नागरिकांना पाणी बचतीचे महत्त्व पटवून द्यावे, तसेच नळांना तोट्या बसविण्याबाबत जागृती करावी, असे आवाहन प्रा. झंवर यांनी केले. तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला निवेदन देऊन पाणी बचतीचे आवाहन करण्यात येणार आहे. प्राचार्या डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे प्रा. झंवर यांनी सांगितले.

### डॉ. कलाम यांची जयंती साजरी

किनगावराजा : रूम्हणा येथील ग्रामपंचायत कार्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती तथा थोर शास्त्रज्ञ डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी ग्रामविकास अधिकारी विनोद सातपुते यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी ग्रामीण गृह अभियंता सरोदे, ग्राम रोजगार सेवक संदीप कायंदे, ग्रामपंचायत कर्मचारी हरिभाऊ जायभाये व प्रकाश जायभाये उपस्थित होते. डॉ. कलाम यांच्या विचारांना उजाळा देत कार्यक्रमातून वाचनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

### पोषण आहाराचे अनुदान तातडीने देण्याची मागणी

**मोताळा, ता. १६ :** शालेय पोषण आहाराचे इंधन व भाजीपाल्याचे अनुदान पाच महिन्यांपासून रखडल्याने मुख्याध्यापक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. हे अनुदान तातडीने द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य अपग्रेड मुख्याध्यापक महासंघाने जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे मंगळवारी (ता. १३) निवेदनाद्वारे केली आहे. विद्यार्थ्यांना पोषणयुक्त आहार मिळावा, या उद्देशाने प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना दररोज मध्यान्ह भोजन दिले जाते. मात्र, गेल्या पाच महिन्यांपासून शालेय पोषण आहाराचे इंधन व भाजीपाल्याचे देयक थकीत असल्याने हा खर्च मुख्याध्यापकांना स्वतःच्या खिशातून करावा लागत आहे. सदर अनुदान वेळेवर उपलब्ध होत नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. आता दसरा आणि दिवाळी हे सण जवळ आले असताना प्रलंबित देयके तातडीने अदा करावीत, अशी मागणी मुख्याध्यापक महासंघाने निवेदनातून केली आहे. निवेदनावर संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल चव्हाण यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

---

# सहकार विद्या मंदिरात आकाश कंदील निर्मिती कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

बुलडाणा, ता. १६ : विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता विकसित व्हावी, त्यांच्या कलात्मक कौशल्य ची जोपासना व्हावी आणि पर्यावरण संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने बुलडाणा येथील सहकार विद्या मंदिरात पर्यावरणपूरक आकाश कंदील निर्मिती कार्यशाळा सकाळ एनआयई आणि सिमरन डेकेअर अँड ॲक्टिव्हिटी सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली.



**बुलडाणाः** आकाश कंदील निर्मिती कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी व शिक्षक.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून आकर्षक आकाशकंदील तयार करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या हाताने वस्तू तयार करण्याचा आत्मविश्वास, कल्पकता आणि कलात्मक दृष्टिकोन विकसित करण्याची संधीही मिळाली. सहकार विद्या मंदिर च्या संचालिका कोमल झंवर यांच्या मार्गदर्शनाखाली विअभ्यासासोबतच प्रात्यक्षिक आणि सर्जनशील शिक्षणाचा अनुभव मिळत आहे. सकाळ एनआयई आणि सिमरन डेकेअर अँड ॲक्टिव्हिटी सेंटर यांच्या संयुक्त उपक्रमातून विद्यार्थ्यांना आनंददायी, कृतिशील आणि पर्यावरणपूरक शिक्षणाची संधी उपलब्ध झाली.

सकाळ NiE NEWSPAPER IN EDUCATION



**धाडः** आकाश कंदील निर्मिती कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी

# विद्यार्थ्यांनी घेतले आकाश कंदील निर्मितीचे धडे

**धाड, ता. १६ :** विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण व्हावी तसेच त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने सहकार विद्या मंदिर, धाड येथे 'सकाळ एनआयई' च्या वतीने पर्यावरणपूरक आकाश कंदील निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी विविध रंगांचे व आकर्षक सजावटीचे साहित्य वापरून सुंदर आकाशकंदील तयार केले. पारंपरिक सण साजरे करताना पर्यावरणाचे संरक्षण कसे करता येईल, याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. स्वतःच्या हातांनी आकाश कंदील तयार करताना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळाली तसेच पर्यावरणपूरक सण साजरे करण्याचा संदेशही देण्यात आला. या कार्यशाळेचे आयोजन 'सकाळ एनआयई' च्या वतीने करण्यात आले होते, तर कार्यशाळेचे व्यवस्थापन सिमरन डेकेअर अँड. ॲक्टिव्हिटी सेंटर यांनी केले.

यावेळी शाळेचे प्राचार्य अरविंद स्वामी, शिक्षकवृंद आणि कर्मचारी उपस्थित होते. शालेय विद्यार्थ्यांना आनंददायी व कृतिशील शिक्षणाचा अनुभव देणाऱ्या या उपक्रमाचे शाळेतून स्वागत करण्यात आले.

---

# अजित इंटरनॅशनल स्कूलमध्ये पर्यावरणपूरक आकाश कंदील निर्मिती कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

नांदुरा, ता.१६ : विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता विकसित करण्यासोबतच पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने अजित इंटरनॅशनल स्कूल, खेरडा येथे सकाळ एनआयई आणि सिमरन डे केअर अँड ॲक्टिव्हिटी सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणपूरक आकाशकंदील निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



**नांदुरा :** कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी व शिक्षक वृंद.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी विविध रंगांचे कागद, आकर्षक सजावटीचे साहित्य आणि कल्पकतेचा वापर करून सुंदर आकाशकंदील तयार केले. स्वतःच्या हातांनी आकाशकंदील तयार करताना विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासोबतच पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्याचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले. सण-उत्सव साजरे करताना पर्यावरणाची काळजी घेणे आणि आपल्या कलाकृतींमधून निसर्गाशी मैत्री जपणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. सकाळ एनआयई आणि सिमरन डेकेअर अँड ॲक्टिव्हिटी सेंटर यांच्या या उपक्रमाचे शाळेच्या वतीने कौतुक करण्यात आले.

### जिवाजी महाले जयंती निमित्त नाभिक मंडळाची रॅली

**देऊळगाव राजा, ता. १६ :** श्री छत्रपती शिवाजी महाराजाचे अंगरक्षक वीर जिवाजी महाले यांच्या ३९१ व्या जयंती निमित्त देऊळगावराजा महाराष्ट्र नाभिक महामंडळा च्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली, यानिमित्त शहरातून निघालेल्या रॅलीत जिवाजी महाले व शिवछत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने शहर दुमदुमले. रॅलीला सिव्हिल कॉलनी धनंजय मोहिते यांचे घरापासून सुरवात करण्यात आली. यावेळी राजकीय तथा सामाजिक व्यक्तींनी रॅलीचे स्वागत करून वीर जिवाजी महाले यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

---

# बोराखेडीच्या शाळेत वाचन प्रेरणा दिवस उत्साहात

**मोताळा, ता. १६ :** भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आदर्श जिल्हा परिषद शाळा, बोराखेडी येथे गुरुवारी (ता. १५) वाचन प्रेरणा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त ग्रंथ प्रदर्शन आणि सामूहिक वाचनाचे आयोजन करण्यात आले.



**मोताळा :** ग्रंथ प्रदर्शनात उपस्थित विद्यार्थी आणि शिक्षक.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. मुख्याध्यापक डॉ. अनिल चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व सांगितले. पुस्तके ही माणसाची खरी मित्र असून वाचनामुळे ज्ञान, विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी दररोज वाचनासाठी वेळ द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. शाळेत भरविण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनात गोष्टी, चरित्र, विज्ञान आणि प्रेरणादायी साहित्याची पुस्तके मांडण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने पुस्तकांची पाहणी केली. यासोबतच विद्यार्थी आणि शिक्षकांनी एक तास सामूहिक वाचन केले. अवांतर वाचनाची आवड निर्माण करणे, स्वअध्ययनाला प्रोत्साहन देणे आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

---



**जळगाव जा. :** उपसरपंच शे.रफीक यांचा सत्कार करताना पदाधिकारी.

# जामोद ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शे. रफीक

■ सकाळ वृत्तसेवा

जळगाव जामोद, ता.१६ : जामोद ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदासाठी मंगळवारी (ता.१३) पार पडलेल्या निवडणूक प्रक्रियेत महाविकास आघाडीचे उमेदवार शे. रफीक शे. रौफ यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

जामोद ग्रामपंचायतीच्या उपसरपंच निवडीसाठी आयोजित सभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच तथा अध्यासी अधिकारी गंगुबाई पुंडलिक दामधर होत्या. ग्रामपंचायतीच्या एकूण १८ सदस्यांपैकी १५ सदस्य सभेला उपस्थित होते. आवश्यक गणपूर्ती पूर्ण झाल्याने दुपारी २ वाजता सभेच्या कामकाजाला सुरुवात करण्यात आली. यापूर्वी ग्रामपंचायतीचे तत्कालीन उपसरपंच बशीरखा पठाण यांनी ३१ ऑगस्ट रोजी सरपंचांकडे आपल्या पदाचा राजीनामा सादर केला होता. त्यामुळे रिक्त झालेल्या उपसरपंचपदासाठी निवड प्रक्रिया राबविण्यात आली. उपसरपंचपदासाठी शे. रफीक शे. रौफ यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने अध्यासी अधिकारी गंगुबाई दामधर यांनी शे. रफीक शे. रौफ यांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले. त्यांच्या निवडीमुळे महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, निवडीनंतर त्यांचा सत्कार करण्यात आला.

या सभेला सरपंच गंगुबाई दामधर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य बशीरखा छोटे खा, शिवनारायण धुरडे, योगेश कुवर, प्रमिला हागे, मोहन भगत, अरुण पारवे, शे. फरहानानूर अय्युब शेख, शे. रफीक शे. रौफ, खुर्शिद बानो मो. याकूब, सुम्मया परवीन शेख सुलतान, विजय गांधी, कैलास बोडखे, सविता ढगे आणि सत्यभामा चव्हाण उपस्थित होते.

---


**बँक ऑफ महाराष्ट्र** / Bank of Maharashtra — भारत सरकार का उद्यम — एक परिवार एक बैंक

**बँक ऑफ महाराष्ट्र**
अकोला झोनल ऑफीस,
अर्थमंगल बिल्डींग , सातव चौक, जठार पेठ, अकोला- ४४४ ००५

**आर्किटेक्ट / फर्निचर / विद्युत कामांच्या कंत्राटदारांच्या पॅनेलसाठी निविदा मागविण्याची सूचना**

बँक ऑफ महाराष्ट्र, अकोला झोन (महाराष्ट्र राज्य) मध्ये पुढील तीन वर्षांसाठी बँकेच्या मान्यताप्राप्त यादीमध्ये समाविष्ट होण्याकरिता, खालील प्रवर्गांकरिता इच्छुक आणि पात्र आर्किटेक्ट/ फर्निचर/ विद्युत काम करणाऱ्या कंत्राटदारांकडून अर्ज मागवत आहे:-

**नागरी बांधकाम/अंतर्गत सजावट/नूतनीकरण दुरुस्ती कामांसाठी आर्किटेक्ट**
**शाखेच्या फर्निचर/विद्युत कामांसाठी कंत्राटदार**

विहित नमुन्यात अर्ज करता येतील. सदर अर्ज आमच्या बँकेच्या www.bankofmaharashtra.bank.in या संकेतस्थळावरुन डाउनलोड करता येईल. प्रत्येक प्रवर्गासाठी स्वतंत्र अर्ज, बँक ऑफ महाराष्ट्रच्या नावे रु. १००० च्या पे-ऑर्डर/डीडी सोबत सादर करावा. रीतसर भरलेला अर्ज पे-ऑर्डर/डीडी सोबत **३०.१०.२०२६** रोजी सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी या उद्देशासाठी नियुक्त केलेल्या समितीद्वारे केली जाईल आणि पॅनेलमध्ये निवड झालेल्या आर्किटेक्ट / कंत्राटदारांना योग्य वेळी त्यानुसार कळवले जाईल. ज्या अर्जदारांचे अर्ज नाकारले गेले आहेत, त्यांच्याशी पुढील कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. प्रस्ताव येथे सादर करावेत: विभागीय व्यवस्थापक, अकोला झोन , बँक ऑफ महाराष्ट्र, **अर्थ मंगल बिल्डींग, झोनल ऑफिस बँक ऑफ महाराष्ट्र, सातव चौक, जठार पेठ, अकोला - ४४ ४००५**

**दिनांक -१७.१०.२०२६ | ठिकाण - अकोला**

**अधिकृत अधिकारी**
**उप अचंल प्रबंधक, अकोला झोन**



**जाहीर नोटीस**

**उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. जि. अकोला यांचे कार्यालय**

**सर्व जनतेला या जाहीर नोटिसद्वारे सूचित करण्यात येते की, या कार्यालयाकडे पुढील अर्जदार**

१) श्री. अविनाश मोहनराव राऊत, रा. लहरिया नगर, कौलखेड-अकोला, ता. जि. अकोला.
२) नितीन मोहनराव राऊत, रा. लहरिया नगर, कौलखेड, अकोला, ता. जि. अकोला.

यांच्याकडून लेखी अर्ज दाखल करण्यात आला आहे की, ते नगर पालिका प्राथमिक शिक्षक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित अकोला र. नं. ३४६ या संस्थेचे सभासद आहेत. त्यांना संस्थेच्या मालकीचे व ताब्यातील शेत सर्व्हे नं. २८/३ वर एसडीओ साहेब अकोला यांच्या कार्यालयातील रेव्हेन्यू केस नं. आदेश क्र. एनएपी-३४/खडकी/६९/८७-८८, दि. १७ मे १९८८ नुसार मंजूर अभिन्यासातील प्लॉटची मालकी उपरोक्त अविनाश मोहनराव राऊत यांना सभासदत्व बहाल करून त्यांच्या नावे करण्यासाठी ३०/०७/२०१० रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र. ३/२ नुसार मालकी हक्काने तबदील, मंजूर केलेला आहे.

उपरोक्त सभासद म्हणून अविनाश मोहनराव राऊत, यांच्या नावावर दोन प्लॉट मंजूर करण्यात आलेले असून, त्याचे ताबा व हक्क वाटप पत्र करून दिलेले आहे. सदर प्लॉटचे वर्णन पुढील प्रमाणे.

**१) प्लॉट क्र. ६४** – ज्याचे क्षेत्रफळ १९२.०० चौ. मी., २०६५.९२ चौ. फूट असून, ज्याची चतुःसीमा :-
**पूर्वेस :** ९ मी रुंद सरकारी रस्ता, **पश्चिमेस :** प्लॉट नं. ६१. **उत्तरेस :** प्लॉट नं. ६३, **दक्षिणेस :** प्लॉट नं. ६५ आहे.
**२) प्लॉट क्र. २०** – ज्याचे क्षेत्रफळ १४७.०० चौ. मी., १५८१.७२ चौ. फूट असून, ज्याची चतुःसीमा :-
**पूर्वेस :** प्लॉट नं. २१, **पश्चिमेस :** प्लॉट नं. १९, **उत्तरेस :** ६ मी. रुंद सरकारी रस्ता. 63 **दक्षिणेस :** प्लॉट नं. २९ आहे.

तसेच नितीन मोहनराव राऊत यांच्या नावे सुध्दा ताबा व हक्क वाटप पत्र उपरोक्त उल्लेखीत ठरावाद्वारे करून दिलेले असून, सदर प्लॉट त्यांना सदस्यत्व बहाल करून ताबा, मालकी तबदील करून दिली आहे. त्याचे वर्णन पुढील प्रमाणे.

प्लॉट क्र. ५४ - ज्याचे क्षेत्रफळ १६१.०० चौ. मी., १७३२.३६ चौ. फूट असून, ज्याची चतुःसीमा :-
**पूर्वेस :** ९ मी रुंद सरकारी रस्ता, **पश्चिमेस :** प्लॉट नं. ५३, **उत्तरेस :** प्लॉट नं. ४३, **दक्षिणेस :** ९ मी रुंद सरकारी रस्ता आहे.

या मालमत्तेबाबत कुणाचाही काही कायदेशीर हक्क, दावा, अधिकार असेल किंवा कोणत्याही प्रकारचा बोजा, नजरगहाण, करारनामा केलेला असेल, कुणाचीही काही तक्रार, हरकत असेल, कुणीही सावकारी व्यवहार, बँक, पतसंस्था, सहकारी सोसायटी, इतर कुठल्याही वित्तीय संस्थेचे हितसंबंध असतील तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील कार्यालयात कागदपत्रे, पुराव्यासह लेखी अर्ज सादर करावा. संपर्क साधावा. त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा ऊजर, अधिकार, हक्क, तक्रार चालणार नाही. मी उपरोक्त संस्थेची अवसायक म्हणून मला प्राप्त महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व १९६१ च्या नियम, उपनियम आणि त्या कायद्यान्वये प्रदत्त अधिकारांचा वापर करून पुढील योग्य कार्यवाही करण्याची प्रक्रिया पार पाडण्यास सक्षम असणार आहे. यासाठी सदरची नोटीस प्रसिद्धीस देत आहोत.

**सही, शिक्क्यासह**
**उपनिबंधक, सहकारी संस्था.**
**जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, अकोला**
**ता.जि. अकोला दि. १५/१०/२०२६**



**जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय**
**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, अकोला व वाशिम**
बुलढाणा अर्बन बँकेच्यासमोर, टिळक रोड, अकोला-444001
दूरध्वनी क्र.-0724-2992166 ईमेल-dwoakola@mahawakf.com

क्र. मरावमं/जिवअका/चौकशी/योजना/१९९/२०२६ — दिनांक : २९ जुलै २०२६

**(जाहीर प्रगटन)**

**उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरिता योजना मंजूर करणेबाबत.**
**वक्फ संस्थेचे नाव व पत्ताः दिवाणपुरा मस्जिद, मौ. मंगरुळपीर, ता. मंगरुळपीर जि.वाशिम**
**(MSBW/WSM/50/2011)**

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार **श्री. अब्दुल करीम अब्दुल रज्जाक व इतर रा. दिवाणपुरा, मौ. मंगरुळपीर ता. मंगरुळपीर जि.वाशिम** यांनी दिनांक **१८/०२/२०२५** रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ वर्षाचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित सर्वसाधारण सभेत **निवडणूकीद्वारे** अशी आहे. योजनेमध्ये नमुद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | अब्दुल करीम अब्दुल रज्जाक | अध्यक्ष |
| २. | मोहम्मद साजिद अब्दुल रऊफ | उपाध्यक्ष |
| ३. | जुनेद अहमद अब्दुल अजीज | सचिव |
| ४. | अन्सार अहमद अब्दुल रहीम | कोषाध्यक्ष |
| ५. | अजमल खान लाल खान | सदस्य |
| ६. | अब्दुल बशर अब्दुल खालिक | सदस्य |
| ७. | मोहम्मद जकाउल्ला मोहम्मद अताउल्ला | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, **जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, अकोला व वाशिम, बुलढाणा अर्बन बँकेच्या समोर, टिळक रोड, अकोला-४४४००१** येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

स्वा./-
(शेख इब्राहीम)
**जिल्हा वक्फ अधिकारी,**
**अकोला व वाशिम**



लाखो मातांचा मार्गदर्शक — 8 लाखांहून अधिक पुस्तकांची विक्री



**सुदृढ, सुसंस्कारित बाळासाठी अवश्य वाचा...**

**आयुर्वेदीय गर्भसंस्कार**

**डॉ. श्रीगुरू बालाजी तांबे**

**₹990**

- गर्भधारणापूर्व तयारी ते बाळ दोन वर्षांचे होईपर्यंतच्या काळातील गर्भधारणा, प्रसूती, बालसंगोपन अशा विविध टप्प्यांची माहिती
- चार दशकांपेक्षाही अधिक आयुर्वेदीय साधनेतून आयुर्वेदिक उपचार आणि औषधांना दिशा देणाऱ्या डॉ. श्रीगुरू बालाजी तांबे यांनी सिद्ध केलेले 'आयुर्वेदीय गर्भसंस्कार'
- विविध मान्यवरांनी गौरवलेले, अमेरिकेतील 'लायब्ररी ऑफ काँग्रेस'मध्ये संदर्भग्रंथ म्हणून निवड झालेले आणि 'एशियन रीडिंग रूम'मध्ये ठेवलेले 'गर्भसंस्कार' या विषयावरील नावाजलेले एकमेव पुस्तक.

८८८८८ ४९०५० — सकाळ प्रकाशन

पुस्तके महाराष्ट्रातील सर्व पुस्तक विक्रेत्यांकडे www.sakalpublications.com आणि amazon.in वर उपलब्ध



**पंजाब नैशनल बैंक** — भारत सरकारचा उपक्रम — **pnb punjab national bank** (A Govt. of India Undertaking)

**एआरएमबी, नाशिक**
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

**सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस**

**स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस**
**(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)**

**सेक्युरिआयझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट अॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट अॅक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात**

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

| लॉट क्र. | शाखेचे नाव<br>खात्याचे नाव<br>कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता | मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे | अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक<br>ब) थकबाकी रक्कम दि. ३०.०९.२०२६ रोजी<br>क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे<br>अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक | अ) अनामत रक्कम (रु. लाख)<br>ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख)<br>क) बोली वाढीव रक्कम | लिलावाचे दिनांक व वेळ | कर्जदारांच्या बोझाचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शाखा : पीएनबी वाशिम (७८१२००)**<br>**कर्जदार: किसन मोतीराम निकम**<br>**कै.किसन मोतीराम निकम यांचे सर्व कायदेशीर वारस**<br>पत्ता: खरोला येथे, काजळंबा पोस्ट, तालुका व जिल्हा. वाशिम- 444505<br>**सह-कर्जदार: संतोष किसन निकम**<br>पत्ता: खरोला येथे, काजळंबा पोस्ट, तालुका व जिल्हा. वाशिम- 444505<br>**हमीदार:**<br>**श्री रामदास प्रल्हाद महाल्ले**<br>पत्ता: कळंबा महाली पोस्ट येथे, तालुका व जिल्हा. वाशिम- 444505 | प्लॉट क्रमांक १२७/१, खरोला, पोस्ट काजळंबा, तालुका आणि जिल्हा - वाशिम<br>**मालकी हक्क - श्री. किसन मोतीराम निकम**<br>**क्षेत्रफळ एरिया - २११.०७ चौरस मीटर पैकी बांधीव क्षेत्र १६८.५० चौरस मीटर**<br>**चतुःर्सिमा -**<br>**पूर्व** - निळकंठ ठाकरे यांची मालमत्ता<br>**पश्चिम** - रस्ता<br>**उत्तर** - रस्ता<br>**दक्षिण** - माधव ठाकरे यांची मालमत्ता<br>**मालमत्ता आयडी: PUNB00828800110** | अ) ०७/०९/२०२०<br>ब) रु. ४६२९८४२.९३ /- + इतर व्याज + खर्च<br>क) ०४/०२/२०२२<br>ड) सांकेतिक ताबा | अ) रु. १२.४६ लाख<br>ब) रु. १.२४६लाख (०३.११.२०२६)<br>क) रु. ०.५ लाख | दि. ०३.११.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत | माहित नाही |

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे

1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, 03.11.2026 @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर https://baanknet.com वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मव्दारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताव्दारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया www.pnb.bank.in. आणि https://baanknet.com ही वेबसाईट पाहावी

स्वाक्षरी/-
**श्री. संतोष सिंग**
अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)

दिनांक - १७.१०.२०२६ | स्थळ - नाशिक

**टीप : स्वैर भाषांतर; तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य**